वाचले :

1 महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, 1966 चे कलम 18

2 महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना (सुधारणा) अधिनियम, 2014 (सन 2014 चा महाराष्ट्र अधिनियम क्र. 43) तसेच महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग, यांचे कडील शासन निर्णय क्रंमाक : व्हिपीएम-2015/प्र.क्र.39/पं.रा.-4, दि. 11 डिसेंबर, 2015

3 मा. जिल्हाधिकारी सो., नाशिक यांचे कडील आदेश क्र.मशा/कक्ष/3/8/कावि/86/2016, दि. 02.02.2016

4 महाराष्ट्र शासन, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, कडील शासन परिपत्रक क्रंमाक : बीसीए 2007/प्र.क्र. 788/कामगार 7-अ, दि. 26 ऑक्टोबर, 2009

5 महाराष्ट्र शासन, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, कडील शासन निर्णय क्रंमाक: बीसीए 2009/प्र.क्र. 108/कामगार 7-अ, दि. 17 जुन, 2010 नुसार बांधकाम कामगार कल्याण उपकर रक्कम रुपये 599982/- + 3 **प्रमाणे पहिला हप्ता 1,99,994/- भरणा दि. 28.08.2018**

6 श्री. नितीन दयालाल कोठारी, रा. तपोवन रोड, पंचवटी, जि. नाशिक यांचा दि. 21.08.2018 रोजीचा अर्ज

7 सहा.संचालक नगररचना विभाग नाशिक यांचेकडील पत्र जा.क्र. /बां.प/ मौजे पारदेवी, ता. इगतपुरी /ग.नं. 279/1/2,30,35(क)(पै)/ ससंनरना/2807, दि. 17.11.2018

8 इकडील कार्यालयाचे अकृषिक परवानगी आदेश क्र.जमाबंदी /एनएएसआर/11/2017, दिनांक 13.03.2018

उपविभागीय अधिकारी, इगतपुरी-त्र्यंबकेश्वर उपविभाग, नाशिक यांचे कार्यालय
क्र.जमाबंदी/बां. प. एस.आर./21 /2018
नाशिक दिनांक : 18 /12 /2018

आदेश

महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम 1966 चे कलम 41 व त्याखालील नियम, म.प्रा.नि. व नगररचना अधिनियम 1966, म.ग्रा.पं. अधिनियम आणि म. प्रा.नि. व नगररचना अधिनियम यामध्ये सुधारणा सन 2014 चा अधिनियम क्रं. 43 मधील तरतुदीनुसार मिळकत धारक **श्री. नितीन दयालाल कोठारी, रा. तपोवन रोड, पंचवटी, जि. नाशिक** यांना त्यांच्या नांवे अधिकार अभिलेखात दाखल असलेल्या मौजे **पारदेवी**, ता. **इगतपुरी**, येथील ग.नं. 279/1/2,30,35/क पै **क्षेत्र 49970 चौ. मी. पैकी बांधकाम करावयाचे क्षेत्र** 3408.99 **चौ.मी.**, क्षेत्रास **रहिवास** या प्रयोजनासाठी बांधकाम परवानगी खालील अटी व शर्तींवर अनुज्ञेय करण्यात येत आहे.

अटी व शर्ती

1. सदरची परवानगी वाचले क्रंमाक 1 ते 5 चे शासन निर्णय, अधिसूचना व नियमांना अधिन राहुन देण्यात येत आहे.
2. **सहा.संचालक नगररचना विभाग नाशिक यांचेकडील दि. 17/11/2018 रोजीचे बांधकाम मंजुरी पत्रात नमुद अटी व शर्ती परवाना धारक यांचे वर बंधनकारक राहतील.**
3. सदरची परवानगी महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम, 1966 चे कलम 41 अन्वये देण्यात येत असुन उपरोक्त नमुद प्रयोजना व्यतिरिक्त इतर अकृषिक वापर आढळून आल्यास सदरची परवानगी रद्द समजण्यात येऊन नियमानुसार दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.
4. परवानाधारक यांनी सदरहु जमीन व त्यावरील बिल्डींग अथवा बांधकामाचा उपयोग ज्या कारणासाठी बांधकाम परवानगी दिली आहे, त्याच कारणासाठी करावा. तसेच सदरहु जमीनीचा किंवा सदरहु जमिनीपैकी काही भागाचा अथवा त्यावरील बिल्डींगचा अथवा बांधकामाचा उपयोग दुसऱ्या कारणासाठी करावयाचा झाल्यास यास उपविभागीय अधिकारी, इगतपुरी-त्र्यंबकेश्वर उपविभाग, नाशिक यांची लेखी पुर्व संमती घ्यावी याच कारणासाठी बिल्डींगचा उपयोग हा संपुर्ण जमीनीचा उपयोग म्हणून मानण्यांत येईल.
5. सदरहु परवानगी ही देखाव्याच्या नकाशामध्ये / प्लॅनमध्ये दाखविल्याप्रमाणे बांधावयाचे बिल्डींगप्रमाणे करण्यास देण्यांत येत आहे. प्लॅनमध्ये दाखविल्याप्रमाणे मोकळी जागा, रस्ते, इत्यादी जागेवर ठेवणे परवानाधारक यांचेवर बंधनकारक राहील. सदर अटीचे पालन न केल्यास सदरची परवानगी रद्द समजण्यात येईल.
6. परवानाधारक यांनी बिल्डींग व इ.बांधकामे पुर्ण केल्यानंतर त्यामध्ये वाढीव बांधकाम किंवा बांधकामामध्ये बदलपुर्व परवानगी शिवाय व सदरहु बांधकामाचे प्लॅन उपविभागीय अधिकारी/सहाय्यक संचालक नगररचना/महानगरपालिका/नगरपालिका यांचेकडुन मंजुर करुन घेतल्याशिवाय करु नये.
7. **परवानाधारक यांनी बांधकामासाठी लागणाऱ्या विटांमध्ये फ्लॉय ऍशद्वारे तयार करण्यांत आलेल्या विटांचा वापर नियमीतपणे करावा.**
8. परवाना धारक यांचेवर पर्यावरण किंवा इतर विभागाचे नाहरकत दाखला घेणे /परवानगी घेणे आवश्यक असल्यास ते घेणे बंधनकारक राहील. तत्सम परवानगी किंवा नाहरकत दाखले परवानाधारक यांनी न घेतल्यास सदरची परवानगी रद्द समजण्यात येईल.
9. भविष्यात महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाकडून ठरविण्यात येणाऱ्या नियंत्रण रेषा व बांधकाम रेषा इत्यादीचे नियम हे परवानाधारक यांचे वर बंधनकारक राहतील सदर नियमावलीमुळे परवानाधारक यांचे बांधकाम काढून टाकावयास लागल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी हि परवाना धारक यांची राहील या बाबत कोणत्याही प्रकारचा मोबदला परवानाधारक यांना मिळणार नाही.
10. बांधकाम पुर्णत्वाचा दाखला घेणे पुर्वी **NOC and subsequently 'Consent to Operate' from the State Pollution Control Board under Air & Water Act and all the conditions laid down by MPCB in the NOC/Consent to Operate are to be complied with by the Project Propponent.** अर्जदार यांचे वर बंधनकारक राहील.

वरीलपैकी कोणत्याही अटी व शर्तीचा तसेच प्रचलित कायदा व नियमांचा भंग झाल्यास व चौकशी अंती सत्यता आढळुन आल्यास सदरची परवानगी रद्द करण्यास पात्र राहील.

उपविभागीय अधिकारी * इगतपुरी * सत्यमेव जयते

(राहुल र. पाटील)
नियोजन प्राधिकारी (ग्रामीण) नाशिक करीता,
उपविभागीय अधिकारी,
इगतपुरी-त्र्यंबकेश्वर उपविभाग, नाशिक

प्रति,

श्री. नितीन दयालाल कोठारी,
रा. तपोवन रोड, पंचवटी, जि. नाशिक